भंडारा पोलीस

## प्रेस नोट

जा.क्र. ५६६/१६ माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय,भंडारा
दिनांकः- १०.०८.२०१७

## सामुहीक बलात्काराचे गुन्हयात आरोपीतांना आजीवन सश्रम कारावास व द्रव्य दंडाची शिक्षा

पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे दिनांक १९.११.२०१३ रोजी पिडित तरूणीने तक्रार दिली की, दिनांक १३.११.१३ रोज बुधवार ला सायंकाळी ६.०० वा. दरम्यान वाणिज्य महाविद्याल, ठाणा पेट्रोलपंप चे मागे शौचास गेली असता तीन लोकानी पाठीमागुन येवुन पिडितेचे तोंड दाबुन व तीला उचलुन बाजुचे शेतात नेले फिर्यादीने बघीतले असता पिडितेचे मोहल्यातच राहणारे सिध्दार्थ भोसकर, दिनेश थापा, सोनु वानखेडे हे असल्याचे दिसले. फिर्यादी पिडित मुलीने आरडा-ओरडा करू नये म्हणुन सोनु वानखेडे यानी तोंड दाबले आणि तिघांनीही पिडिते सोबत जबरीने सामुहीक बलात्कार केला व याबाबत कोणालाही काहिही सांगीतले किंवा पोलीस स्टेशलला तक्रार दिली तर जिवानीशी ठार मारून टाकण्याची धमकी दिली. पीडीतेला तेथेच टाकुन निघुन गेले. पिडित रडत-रडत घरी गेली व घडलेला प्रकार आईस व नातेवाईकांना सांगीतला. भितीपोटी लगेच पोलीस स्टेशनला तक्रार देण्यास गेली नाही परंतु १९.११.१३ रोजी आई व नातेवाईकांनी हिम्मत दिल्याने तक्रार दिली त्यावरून तिन्ही आरोपीतांना विरूध्द कलम ३७६(ड),५०६ भादवि सहकलम ३(२)(१२), ३(२)(व्ही) अॅट्रासिटी अॅक्ट नुसार सपोनि व्हि.एम. तायडे यांनी गुन्हा नोंद केला व गुन्हयाचा तपास तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी, सचिन गोरे यांनी केला गुन्हयातील आरोपीतांना अटक केली तपासामध्ये **आरोपी १) सिध्दार्थ लक्ष्मण भोसकर, वय १९ वर्ष, रा. झोपडपटटी पेट्रोलपंप ठाणा, २) सोनु भाउराव वानखेडे, वय २८ वर्ष, रा. झोपडपटटी पेट्रोलपंप ठाणा, ३) दिनेश नरेश थापा, वय १७ वर्ष, रा. झोपडपटटी पेट्रोलपंप ठाणा** यांचे विरूध्द गुन्हा केल्याबाबतचे पुरावे प्राप्त झाल्याने दोषारोप पत्र तयार केले गुन्हयातील आरोपी दिनेश थापा हा अल्पवयीन असल्याने त्याचे विरूध्द बाल न्यायालय, भंडारा येथे दोषारोप पत्र दाखल करण्यात आले व इतर दोन आरोपीतांविरूध्द जिल्हा सत्र न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले.

सदर गुन्हयातील दोन सज्ञान आरोपीतांविरूध्द न्यायालयीन सुनावणी मा. सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे साहेब यांचे समक्ष चालली. सुनावणी मध्ये सरकारी पक्षातर्फे अॅडव्होकेट दुर्गा तलमले, सहा. सरकारी अभियोक्ता सत्र न्यायालय, भंडारा यांनी कामकाज पाहिले सुनावणी दरम्यान एकुण ९ साक्षदार तपासण्यात आले. आज दिनांक १०.८.२०१७ रोजी मा. सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे

साहेब यांनी गुन्हयात आरोपी नामे १) सिध्दार्थ लक्ष्मण भोसकर, वय १९ वर्ष, रा. झोपडपटटी पेट्रोलपंप ठाणा, २) सोनु भाउराव वानखेडे, वय २८ वर्ष, रा. झोपडपटटी पेट्रोलपंप ठाणा, **यांना सामुहीक बलात्काराचे गुन्हयात दोषी ठरवत दोघांनाही आजन्म सश्रम कारावास व १०,००० रूपये दंडाची शिक्षा व दंड न भरल्यास ६ महिणे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली.** सदर गुन्हयात पैरवी अधिकारी म्हणुन पो.हवा. मनोहर रामटेके व पो.हवा.किशोर ठेंगरी, ब.नं. ६५६, पोलीस स्टेशन जवाहरनगर यांनी पाहिले आहे. न्यायालयीन सुनावणी दरम्यान सरकारी अभियोक्ता ॲडव्होकेट दुर्गा तलमले यांनी सरकार तर्फे योग्य बाजु मांडली. कृपया सदरची प्रेस नोट फेब पेजवर देण्यास विनंती.

10.8

(एस.व्ही. कुलकर्णी)
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनीधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रकसध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.